# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्र. ०७१२–६४६५१४५/१४६ E-mail:ronagpur.dte@gmail.com फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

Web Site : rdtenagpur.org.in


त्वरीत

क्रमांक :— तंशिस/प्राकाना/शैवि—३/शिक्षण शुल्क/२०१२/1686

दिनांक : 20 JUN 2012.

प्रति,

प्राचार्य/संचालक

____________________

____________________

____________________

____________________

____________________

(सर्व पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणा—या सर्व संस्था)

**विषय :— शिक्षण शुल्क समितीने मान्य केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिकचे शुल्क आकारणी करणा—या संस्थांवर कारवाई करणेबाबत...**

**संदर्भ :— १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. टीईएम २००४/(५४५/०४)/ तंशिं—१, दि. ११.०१.२००५.**

**२) मा. शहर अध्यक्ष, राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेस, नागपूर शहर यांचे दि. २०.०६.२०१२ रोजीचे ज्ञापन.**

शैक्षणिक वर्ष २०१२—१३ मधील संचालनालयाच्या वतीने राबविण्यांत येणा—या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे. त्याचप्रमाणे संस्था स्तरावरील अल्पसंख्यांक कोटा व व्यवस्थापन कोटा इ. जागांसाठी देखील संस्था स्तरावर प्रवेश प्रक्रिया सुरू झालेल्या आहेत. त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, राज्याच्या शिक्षण शुल्क समितीने जे वार्षिक शुल्क निर्धारित केलेले आहे, ते निर्धारित शुल्क तसेच विद्यापीठाने ठरविलेले परीक्षा व एनरॉलमेंट फी या व्यतिरिक्त संस्थांनी कुठलेही शुल्क आकारू नये असे संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयान्वये शासनाने कळविलेले आहे.

सदरहू शुल्क हे दरवर्षी आकारावयाचे असून काही संस्था विद्यार्थ्यांकडून तीन ते चार वर्षाचे एकुण शुल्क एकाचवेळी आकारत असल्याच्या लेखीं तक्रारी या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत. ही अत्यंत गंभीर व आक्षेपार्ह बाब आहे. एखादी संस्था विहीत शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारत असल्याची तक्रार या कार्यालयास प्राप्त झाल्यास, सदरहू संस्थ्येची चौकशी करण्यांत येवून संस्था दोषी आढळल्यास, संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदरचे जास्तीचे शुल्क हे कॅपिटेशन फी म्हणून समजण्यांत येईल व त्यासंबंधी महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट १९८७ नुसार, सदरचे जास्तीचे शुल्क हे कॅपिटेशन फी म्हणून समजण्यांत येईल व आपल्या संस्थेची मान्यता रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे दाखल करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर

प्रत : प्रोग्रामर हेच कार्यालय हयांना आवश्यक कार्यवाहीसाठी. सदरहू पत्र या कार्यालयाचे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत यावे.